एशियाटीक सोसायटी, मुंबई या संस्थेस २०२५-२६ या वर्षासाठी रु. ४० लक्ष निधी वितरीत करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक -मराग्रं-२०२५/प्र.क्र.८०/ई-११५९३३८/ग्रं.क.
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ फेब्रुवारी, २०२६

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.९२/साशि-५, दि.०८.०३.२०२३
२) शासन ज्ञापन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मराग्रं-२०२५/प्र.क्र.८०/ई १५९३३८/ ग्रं.क., दि.१६.०९.२०२५
३) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र.३४/ एसोमुं. निधी मागणी/२०२५-२६/शि.का.नागपूर/०३, दि.०९.१२.२०२५.

ज्ञापन :

उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयाव्दारे एशियाटीक सोसायटी, मुंबई या संस्थेस प्रतिवर्षी रु.१.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुषंगाने उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ येथील ज्ञापनाव्दारे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये अर्थसंकल्पीत निधीमधून रु.६०.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात मान्यता देण्यात आली आहे.

ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र. ३ येथील पत्राव्दारे एशियाटीक सोसायटी, मुंबई या संस्थेस सन २०२५-२६ या वर्षासाठी रु.४०.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती, त्यानुषंगाने सदर निधी वितरीत करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त खर्च करताना संदर्भाधीन क्र. १ येथील दि.०८.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयामधील अटींचे पालन करणे आवश्यक राहील.

३. सदर खर्च मागणी क्र.डब्लू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५, सार्वजनिक ग्रंथालये, (०३) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य, (०३) (१०) एशियाटीक सोसायटी, मुंबई ग्रंथालयांचा सर्वांगिण विकास (२२०५ ३४७५) (कार्यक्रम) ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षातर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.

४. या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र एशियाटीक सोसायटी, मुंबई यांनी विहित मुदतीत ग्रंथालय संचालनालयामार्फत शासनास सादर करावे.

५. एशियाटीक सोसायटी, मुंबई या संस्थेने सदर निधीच्या विनियोजन केल्याबाबतचा बाबनिहाय अहवाल ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करावा. तसेच, एशियाटीक सोसायटी, मुंबई यांनी सादर केलेल्या बाबनिहाय अहवालाची ग्रंथालय संचालक यांनी तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

६ सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या (वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र. १६/व्यय-५, दि.१४.०१.२०२६ अन्वये) प्राप्त सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०२१७१७५०२७९४०८ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TATOBA KUNDLE

Digitally signed by AJIT TATOBA KUNDLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=e8d77478a97d2485b55f7fc94d7932346a883cbe88fedf8ca544b731a7db9fb6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4865016DE0AB999E5364A36B2DA1F9AD227B8C0EB513CD7E59305D7539B1F9CA, cn=AJIT TATOBA KUNDLE
Date: 2026.02.17 17:51:18 +05'30'

(अ.ता.कुंडले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८. कक्ष अधिकारी (व्यय-५/अर्थ-८), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अवर सचिव, (अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
११. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३. अध्यक्ष/ सचिव, एशियाटीक सोसायटी, नगर भवन, मुंबई
१४.निवडनस्ती (ग्रं.क.), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.